आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक १३ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार; ३ युद्धनौका राष्ट्राला करतील अर्पण.
2. सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना.
3. आरोग्य विषयक कार्यक्रम अंमलबजावणी निर्देशांकात गडचिरोली जिल्हा राज्यात तिसरा.
4. नागपूरमधील वायुसेना नगर येथील मेंटेनन्स कमांडच्या मुख्यालयात उद्या साजरा केला जाणार नववा सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहणार उपस्थित.

---------------------------

पंतप्रधान दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधानांच्या हस्ते मुंबईतल्या डॉकयार्ड इथं नौदलाच्या ३ युद्धनौका आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी आणि आयएनएस वाघशीर राष्ट्राला अर्पण करण्यात येणार आहेत. या ३ युद्धनौका नौदलात सामील होणं हे संरक्षण उत्पादन आणि सागरी सुरक्षा क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याच्या दृष्टीनं भारताचं आणखी एक पाऊल आहे. आयएनएस सुरत ही जगातल्या सर्वात मोठ्या आधुनिक विध्वंसक युद्धनौकांपैकी एक आहे. आयएनएस निलगिरीचं डिझाईन भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्युरोनं तयार केलं आहे. आयएनएस वाघशीर या पाणबुडीची निर्मिती फ्रान्सच्या नौदलाच्या सहकार्यानं करण्यात आली आहे.याशिवाय, पंतप्रधान नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहन मंदिराचं उद्घाटनही करतील.

---------------------------

मुख्यमंत्री आढावा बैठक

सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे. पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कामाचा आढावा

घेताना ते बोलत होते. समृध्दी महामार्गालगत ॲग्रो हब उभारा, कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळींची संख्या वाढवा असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. नवी मुंबईत शेतमालासाठी महा बाजार उभारण्याच नियोजन आहे. हा बाजार आंतरराष्ट्रीय दर्जाचा असणार असून किमान दोनशे ते अडीचशे एकर जागेमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येणार असल्याच अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी सांगितल. राज्यातल्या प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती, कोकणात माशांसाठी तर आदिवासी भागात स्थानिक उत्पादनासाठी बाजार समिती स्थापन केली जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले. बाजार समित्यांच उत्पन्नानुसार वर्गीकरण करण्याचंही नियोजन आहे. आज याशिवाय मुख्यमंत्र्यांनी शालेय शिक्षण विभाग आणि पर्यटन विभागातील शंभर दिवसाच्या करावयाच्या कामगिरीचा देखील आढावा घेतला. राज्यातील शालेय शिक्षकांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन चांगल परिवर्तन घडू शकत. या बळावर महाराष्ट्र शालेय शिक्षणामध्ये पुन्हा एकदा आघाडीवर येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत व्यक्त केला. विद्यार्थिनींना सायकल वाटप केल्यामुळे त्यांच शाळेत येण्याच प्रमाण वाढल्याच सिद्ध झाल आहे. ही योजना सुरू राहावी अस सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शाळेतील पहिल्या दिवसाचे स्वागत करा. यासाठी सर्व मंत्री, सचिव यांच्यासह मान्यवरांना पहिल्या दिवशी शाळेत जाण्यासाठी सूचित करा. पर्यटन विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी केंद्र आणि राज्य शासनाकडून राबविण्यात येणारे पर्यटन प्रकल्प गतीन पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्याच सांगून राज्य लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत पर्यटन विभागाच्या 14 सेवा आपले सरकार संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. प्रत्येक जिल्ह्यात मत्स्यालय,धार्मिक स्थळे, विमानतळ विकसित करण्याचे तसच पहिल्या टप्प्यात शिर्डी,पुणे,नागपूर,शेगाव येथे काम सुरू करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

---------------------------

सण

मकरसंक्रांतीचं पर्व देशभरात उत्साहान सुरु झालं. आज संक्रांतीचा आदला दिवस. देशाच्या विविध भागात विविध नावांनी हा सुगीचा उत्सव साजरा केला जातो. पंजाब, हरयाणा आणि उत्तर भारतात लोहडी, ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू, महाराष्ट्र आणि तेलंगणात भोगी म्हणून साजरा केला जातो. गुजरातमधे उत्तरायणानिमित्त आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवाचं आयोजन करण्यात

आलं आहे. महाराष्ट्रातही संक्रांतीनिमित्त खरेदीचा उत्साह दिसत आहे. तीळ गूळ हलव्याचे दागिने, तसंच विविध आकारांचे रंगीबेरंगी पतंग अशा वस्तूंनी बाजार फुलले आहेत.

---------------------------

कुंभमेळा

महाकुंभ मेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानान भव्य आध्यात्मिक मेळाव्याची सुरुवात झाली. २६ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महाकुंभात सहभागी होण्यासाठी लाखो भाविक तिथं जमले असून आज ५० लाख भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिलं आहे. प्रयागराजमध्ये होणारा महाकुंभ हा जगातला सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा असून त्यात ४५ कोटींहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी महाकुंभ नगरमधील मंदिरं आणि प्रमुख स्थळांवर सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे. या ठिकाणी सात थरांची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. पोलिसांनी पाण्याखाली ड्रोन आणि एआय-सक्षम कॅमेऱ्यांसह प्रगत तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. प्रयागराजला ये-जा करणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित व्हावा म्हणून रेल्वेच्या तीन हजार ३०० विशेष गाड्यांसह १० हजारपेक्षा जास्त गाड्या धावत आहेत. पायाभूत सुविधांची निर्मिती, सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि इतर गोष्टींवर प्रशासनानं विशेष भर दिला आहे. अशी माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीने दिली आहे.

---------------------------

गडचिरोली रँकींग

आरोग्य सेवा संचालयान आरोग्यविषय कार्यक्रम अंमलबजावणीच्या निर्देशांकात गडचिरोली जिल्ह्याला तिसऱ्या क्रमांकाची रँकींग दिली आहे.राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशकांवर आधारित रँकिंग राज्यस्तरावर तयार करण्यात येते. गडचिरोली जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागान राबवलेल्या उपक्रमाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रताप शिंदे यांनी आकाशवाणीला माहिती दिली.

*गडचिरोली जिल्ह्यामध्ये आपण ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३७६ आरोग्य उपकेंद्र यांच्यामार्फत आरोग्य सेवा उपलब्ध करून देत असतो. या रँकिंग करीता जवळपास ६४ निर्देशंक वापरले गेले होते. याच्यामध्ये प्रामुख्याने माता व बाल यांच्याशी निगडीत प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सेवा, जसे की लसीकरण, गरोदर माता नोंदणी व त्याच्याबाबतच्या सर्व आरोग्य सेवा याचा*

*समावेश होता. त्याचबरोबर असांसर्गिक  आजारावरील जसे की मधुमेह, रक्तदाब याबद्दलचे उपचार, निदान या बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.*

---------------------------

**सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस**

**नागपूरमधील वायुसेना नगर येथील मेंटेनन्स कमांडच्या मुख्यालयात उद्या** 14 **जानेवारी  मंगळवार रोजी नवव्या सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवसाच आयोजन केल जाणार आहे. भारतीय लष्कराचे पहिले कमांडर-इन-चीफ फिल्ड मार्शल के एम करिअप्पा यांच्या औपचारिक सेवानिवृत्तीची आठवण म्हणून दरवर्षी** 14 **जानेवारी रोजी सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस साजरा केला जातो.  फिल्ड मार्शल के एम करिअप्पा** 1953 **मध्ये सेवेतून निवृत्त झाले होते. हा महत्त्वाचा दिवस आपल्या निवृत्त सशस्त्र दल कर्मचाऱ्यांच्या निःस्वार्थ सेवा आणि बलिदानाचा सन्मान करतो तसच आपल्या देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेच रक्षण करण्याच्या त्यांच्या अटल वचनबद्धतेचा गौरव करतो. या कार्यक्रमाला केंद्रीय  मंत्री नितीन गडकरी तसच विविध सेवाधिकारी आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सशस्त्र दलातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांच निराकरण करण्यासाठी, डीआयएव्ही, डीएव्ही,स्पर्श, डीएनव्ही, ईसीएचएस, पीएसएएस, पीडीएएस, बँका आणि सेवा कल्याण संस्था यांसारख्या विविध सरकारी संस्थांद्वारे मदत डेस्क स्थापन करण्यात येणार आहे. तिन्ही सेना दलातील सुमारे** 1200-1500 **निवृत्त कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित राहातील.**

---------------------------

**स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या पूर्व तयारी**

**स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या पूर्व तयारी बाबत आढावा बैठक मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेत  आज मनपात घेण्यात आली. या बैठकीत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या तयारी बाबत सादरीकरण करण्यात आल आणि  संबंधित अधिकाऱ्यांना स्वच्छतेसंबंधी कार्याचे निर्देश देण्यात आले. नागपूर शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षणची चमूद्वारे पाहणी केली जाणार आहे. त्यादृष्टीन दहाही झोनमध्ये सुरू असलेले स्वच्छतेचे कार्य आणि आवश्यक कामाचा यावेळी डॉ.अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी आढावा घेतला.**

---------------------------

**हवामान विभाग** 15**व्या स्थापना दिन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी  उद्या 14 जानेवारी रोजी सकाळी 10.30 वाजता नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे भारतीय हवामान विभागाच्या 15 व्या स्थापना दिनाच्या समारंभात सहभागी होतील. ते तिथे उपस्थितांना संबोधित देखील करतील. भारताला हवामान आणि वातावरणाप्रति सजग देश बनवण्याच्या उद्दिष्टासाठी पंतप्रधान मिशन मौसम चे उद्घाटन करतील. अत्याधुनिक हवामानवेधी तंत्रज्ञान आणि प्रणालींचा विकास, उच्च रिझोल्युशनची वातावरणीय निरीक्षण नोंदवणे, अत्याधुनिक रडार आणि  उपग्रह तसच उच्च कार्यक्षमतेचे संगणक तयार करणे ही या मिशनची उद्दिष्ट आहेत.

---------------------------